# <u>पंतप्रधान रोजगार योजना.</u>

केंद्र पुरस्कृत पंतप्रधान रोजगार योजना २ ऑक्टोबर १९९३ पासून राष्ट्रीयकृ त बँका/शेडयुल्ड बँक व जिल्हा उद्योग केंद्रामार्फत राबविली जात आहे.सदर योजनेअंतर्गत आर्थिकदृष्टया कमकुवत गटातील सुशिक्षित बेरोजगारांनी स्वयंरोजगार सुरु करुन स्वत:चे पायावर उभे रहाणे हा या योजनेचा मुख्य उदेश आहे.योजनेच्या पात्रतेच्या अटी व शर्ती खालीप्रमाणे आहेत.

**पात्रता.**

१) **<u>शिक्षण-</u>** कमीत कमी ८ वी पास/सहा महिन्यांचा सरकार मान्य व्यवसाय अभ्यासक्रम पूर्ण केलेला.

२) **<u>वयोमर्यादा</u>**- १८ ते ३५ वर्षे (महिला,अपंग,माजीसैनिक,अनुसुचित जाती/जमाती यांचेसाठी वयोमर्यादा १८ ते ४५ वर्षे)

३) **<u>वार्षिक उत्पन्न</u>**- कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न रु.१.०० लाखाचे आत असावे.

४) **<u>वास्तव्य-</u>** जिल्हयातील सलग ३ वर्षे वास्तव्य असावे.

५) **<u>थकबाकीदार</u>**- कोणत्याहि राष्ट्रीयकृत बँका,वित्तीय संस्था,सहकारी बँका यांचा थकबाकीदार नसावा.ज्यांनी यापूर्वी शासकीय अनुदानीत योजनेतून लाभ घेतलेला आहे असे अर्जदार पात्र ठरणार नाहीत.

६) **<u>व्यवसाय-</u>** शेती पूरक व्यवसायांसह (शेती पिकवणे वगळून) इतर सर्व आर्थिकदृष्टया सक्षम असे व्यवसाय.

**<u>योजनेची वैशिष्टये.</u>**

१ **<u>प्रकल्प किमंत</u>-**

(i) उद्योग प्रवर्गातर्गत प्रकल्पाची कमाल मार्यादा रु.५.०० लाख.

(ii) भागिदारीत उद्योग प्रकल्प मर्यादा रु.१०.०० लाख.

(iii) सेवा व व्यवसाय प्रवर्गात प्रकल्पाची कमाल मर्यादा रु.२.०० लाख.

(iv) भागिदारीत सेवा व व्यवसाय प्रवर्गात प्रकल्पाची कमाल मर्यादा रु.१०.०० लाख.

(v) ५ ते २० सुशिक्षित बेरोजगारांनी एकत्र येवून स्वयंस्फुर्त तयार केलेल्या **स्वयंसहायता गट**ातील सदस्यांसाठी प्रकल्प किंमतीची मर्यादा नाही.

(vi) **स्वयंसहायता गट**ातील प्रत्येक सदस्यांना १५ टक्के कमाल रु.१५०००/- अनुदान असून गटासाठी एकुण कमाल अनुदान रु.१.२५ लाख असेल.

(vii) **स्वयंसहायता गट**ातील सर्व सदस्यांनी मिळून (अनुदानासह स्वत:ची रक्कम) प्रकल्पाच्या २० टक्के उभी करणे आवश्यक आहे.

(viii) **स्वयंसहायता गट**ासाठी गटातील प्रत्येक सभासदास उद्योग प्रवर्गासाठी रु.५.०० लाख व सेवा/व्यवसाय प्रकल्पासाठी रु.२.०० लाख रक्कमेस तारण ठेवण्याची आवश्यकता नाही.

(ix) **स्वयंसहायता गट**ातील सर्व सदस्यांनी आर्थीकदृष्टया सक्षम असणारा कोणताही व्यवसाय गटातील सर्व सदस्यानी मिळून करणे आवश्यक आहे.

१) **अनुदान/स्व गुतंवणूक** -प्रत्येक वैयक्तिक लाभार्थीस मजुंर प्रकल्पाच्या १५ टक्के कमाल रुपये १२५००/-अनुदान मिळेल लाभार्थाचे स्वत:चे भाग भांडवल अनुदानाच्या रक्कमेसह प्रकल्प किमतीच्या ५ ते १६.२५ टक्के परंतु २० टक्के मर्यादे पर्यत असेल.

२) **तारण**-उद्योग प्रवर्गासाठी प्रती लाभार्थी रुपये ५ लाखा पर्यत तसेच व्यवसाय/सेवा प्रवर्गास रुपये २ लाखाचे मर्यादेत कोणतेही तारण लागणार नाही.

३) **व्याज व कर्ज परतफेड**-रिझर्व्ह बॅकेच्या प्रचलित नियमाप्रमाणे कर्जावर नॉर्मल व्याज आकारण्यात येईल व कर्जाची परतफेड विलंबावधीसह ३ ते ७ वर्षापर्यत असेल.

४) **आरक्षण**-महिला/मागास वर्गीयांना(अनु.जाती/जमाती/इमाव) प्राधान्य देण्यात येईल.

## संपर्क.

योजनेअंतर्गत विहित नमुन्यातील अर्ज विनामुल्य उपलब्ध असुन अर्ज भरण्यासाठी व आवश्यक माहितीसाठी जिल्हा उदयोग केंद्र,कार्यालय-रायगड-अलिबाग तसेच तालुका स्तरावर पंचायत समिती कार्यालयात संबंधितांनी ठराविक दिवशी उद्योग निरिक्षकाशी संपर्क साधावा.

# पंतप्रधान रोजगार योजना कार्यान्वयन कार्यप्रणाली

पंतप्रधान रोजगार योजनेची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी या कार्यालयात उपलब्ध असलेले उद्योग निरीक्षक यांना आठवडयाचे ठराविक दिवशी पंचायत समिती कार्यालयात सुशिक्षित बेरोजगारांचे योजनेअंतर्गतचे विहित नमुन्यातील अर्ज भरुन घेणे, मदत करणे, अर्ज स्विकारणे व इतर आवश्यक मार्गदर्शन करणे अशाप्रकारचे काम नेमून दिलेले आहे. त्या दिवशी संबंधित अर्जदार उद्योग निरीक्षकांशी संपर्क साधून आपला अर्ज दाखल करतात. तसेच जिल्हा उद्योग केंद्र कार्यालयामध्ये प्रत्येक कामाचे दिवशी येणा-या उमेदवारांना योजनेची इत्यंभूत माहिती देवून त्यांचे अर्ज कार्यालयात स्विकारले जातात त्यामुळे उमेदवारांना योजना समजण्यास वा अर्ज दाखल करण्यास कसल्याही प्रकारची अडचण निर्माण होत नाही.

## उद्योग निरीक्षकांचे तालुकानिहाय भेटीचे वार, वेळ व ठिकाण

| अ.क्र. | उद्योग निरीक्षकांचे नांव | तालुक्याचे/बसण्याचे ठिकाण | वेळ | वार |
|---|---|---|---|---|
| ०१. | श्री.उ.गो.माने | पनवेल इन्ड.इस्टेट ऑफिस-पनवेल | ११ ते २ | मंगळवार/शुक्रवार |
| | | पंचायत समिती कर्जत | ११ ते २ | गुरूवार |
| ०२. | श्री.एस.एन.ठाकूर | पंचायत समिती, रोहा | ११ ते २ | मंगळवार |
| | | पचायत समिती, उरण | ११ ते २ | बुधवार |
| | | पंचायत समिती, पेण | ११ ते २ | गुरूवार |
| ०३. | श्री.आर.एस.सांगोळे | पंचायत समिती, तळा | ११ ते २ | १,३ व ५ वा गुरूवार |
| | | पंचायत समिती, माणगांव | ११ ते २ | शुक्रवार |
| ०४ | श्री.नारगुंडि | एक बिंदु योजना केंद्र, महाड | ११ ते २ | मंगळवार |
| | | पंचायत समिती-पोलादपूर | ११ ते २ | १,३ व ५ वा बुधवार |
| ०४. | श्री.व्ही.डी.शेटीया | जि.उ.कें.कार्यालय, अलिबाग | ११ ते २ | सोमवार |
| | | सिटी बस डेपो-खोपोली | ११ ते २ | बुधवार |
| | | पंचायत समिती-पाली | ११ ते २ | १,३ व ५ वा शनिवार |
| ०५. | श्री.व्ही.बी.तेली | पंचायत समिती-मुरुड | ११ ते २ | मंगळवार |
| | | पंचायत समिती -श्रीवर्धन | ११ ते २ | गुरूवार |
| | | पंचायत समिती-म्हसळा | ११ ते २ | शुक्रवार |

त्याचप्रमाणे उद्योग निरीक्षकांना पंचायत समिती कार्यालयात मा.सभापतीमहोदय/उपसभापतीमहोदय, गट विकास अधिकारी तसेच मुख्याधिकारी, नगर परिषद यांना संपर्क साधून विशेष करुन बचत गटांची जास्तीत जास्त प्रकरणे मिळण्यासाठी प्रयत्न करण्याच्या सुचना देण्यात आलेल्या आहेत.

उपरोक्त प्रमाणे उद्योग निरीक्षक तसेच कार्यालयात प्राप्त झालेल्या अर्जांना शिफारस करण्यासाठी सदरचे अर्ज योजनेच्या कार्यप्रणालीप्रमाणे नियुक्त कार्यपथक समितीमध्ये ठेवून रितसर मंजूरी घेवून सदर अर्ज संबंधित बँक शाखांकडे विनाविलंब पाठविले जातात. सदर कार्यपथक समितीची सभा प्रत्येक सोमवारी घेतली जाते. सर्वसाधारणपणे कार्यपथक समितीमध्ये कोणताही अर्ज नामंजूर होणार नाही याची दक्षता घेतली जाते.

**कार्यपथक समितीची रचना खालीलप्रमाणे आहे.**

| | |
|---|---|
| १.महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र | अध्यक्ष |
| २.जिल्हा अग्रणी बँक व्यवस्थापक, बँक ऑफ इंडिया | सदस्य |
| ३.जिल्हा समन्वयक/राष्ट्रीयकृत बँका | सदस्य |
| ४.जिल्हा रोजगार व स्वयंरोजगार मार्गदर्शन अधिकारी | सदस्य |
| ५.जिल्हा व्यवसाय व प्रशिक्षण अधिकारी | सदस्य |
| ६.जिल्हा समाजकल्याण अधिकारी | सदस्य |
| ७.जिल्हा खादी ग्रामोद्योग अधिकारी | सदस्य |
| ८.व्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र | सदस्य सचिव |

संबंधित अर्ज बँकेत पाठविल्यानंतर सदर अर्जावर कार्यवाही करण्याचे अधिकार बँक शाखा व्यवस्थापकांना आहेत. तथापि जिल्हा अग्रणी प्रबंधक, तसेच जिल्हा समन्वयक संबंधित बँक यांचेमार्फत संबंधित शाखा व्यवस्थापकांना अर्जाच्या मंजुरीसाठी पाठपुरावा करण्यात येतो.

बँकेमार्फत अर्ज मंजुर झाल्यानंतर प्रत्यक्ष कर्ज वितरणाच्या कालावधीत योजनेअंतर्गत आवश्यक असलेले प्रशिक्षण जिल्हयात उपलब्ध असलेल्या मिटकॉन आणि महाराष्ट्र उद्योजकता विकास केंद्र संस्थेमार्फत दिले जाते. संबंधित प्रशिक्षणावरती जिल्हा उद्योग केंद्राचे नियंत्रण असते. उमेदवाराने आवश्यक ते प्रशिक्षण पूर्ण केल्यानंतर त्यांना त्या प्रशिक्षण कालावधीचे प्रमाणपत्र दिले जाते. सदर प्रमाणपत्र बँकेत सादर केल्यानंतर लाभार्थ्यास कर्ज वितरण करण्यात येते.

सदर योजनेची जिल्हयातील सर्व संबंधितांना माहिती मिळण्यासाठी जिल्हा माहिती अधिकारी कार्यालयामार्फत योजनेस प्रसिध्दी दिली जाते.

उद्योग निरीक्षकांना मागिल सभेत ठरल्याप्रमाणे पंचायत समिती कार्यालयात मा.सभापती/उपसभापतीमहोदय, पंचायत समिती, यांना भेटून जास्तीत जास्त प्रकरणे प्राप्त करण्यासाठी प्रयत्न करण्याच्या तसेच ग्रामसभेस उपस्थित राहून योजनेबाबत ग्रामसेवकांना योजना समजावून सांगून संबंधित गावातील पात्र उमेदवारांना योजनेत सामावून घेण्यासाठी तसेच बँकांमध्ये पाठविलेले अर्ज मंजूरीसाठी सततचा पाठपुरावा करण्यासाठी मार्गदर्शित करण्यात आलेले आहे.